# पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग

टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०२८/२२८४७३ फॅक्स क्र.०२१४१-२२८७८९,
ई-मेल- sp.raigad@mahapolice.gov.in


क्रमांक.176/आस्था-प्र.लि./पो.भ.2022-2023/नियुक्ती-52/5/2024 अलिबाग, दि. 03/10/2024

**संदर्भ** :- 1) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011, क्र.आरसीटी-311/प्र.क्र.228/पोल-5अ, दिनांक 16/06/2011.
2) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम (पहिला सुधारणा) 2022, क्र.सेप्रनि-1818 /प्र.क्र. 313 (भाग-2)/पोल-5अ, दिनांक 23/06/2022.

**विषय** :- **पोलीस शिपाई भरती - 2022-2023.**
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत.

*****

आदेश :-

रायगड जिल्हा पोलीस घटकात सन 2022-2023 मध्ये रिक्त असलेल्या 391 पोलीस शिपाई ( त्यामध्ये 09 बॅण्डस्मन पदे समाविष्ठ ) पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यांत आली होती. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परिक्षा व मैदानी चाचणीमध्ये गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद पुरुष व महिला उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, भाग-1 मधील नियम क्र.63 मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील नमुद उमेदवारांना रायगड जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवर **"पोलीस शिपाई (गट-क)"** या संवर्गात सातव्या वेतन आयोगातील सुधारीत वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-7 : रु.21700-69100/- व विशेष वेतन रु.750/- (अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते) या वेतन संरचनेतील रु.21700/- या प्रारंभिक वेतनावर पोलीस मुख्यालय, अलिबाग-रायगड येथे **दि. 04/10/2024** पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नाव | लिंग | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 12911 | प्रथमेश दत्तात्रय पाटील | पुरुष | सा.शै,दु.मा.व. | सा.शै,दु.मा.व. | खेळाडू |
| 2 | L 1910 | श्रावणी विठ्ठल शिंदे | महिला | भ.ज.-ब | भ.ज.-ब | महिला 30% |
| 3 | 6720 | अभिनव मारुती मदने | पुरुष | वि.जा.-अ | खुला | सर्वसाधारण |
| 4 | L 2320 | प्रतिक्षा संजय पाटील | महिला | भ.ज.-क | खुला | महिला 30% |
| 5 | 10422 | संदप शंकर मासाळ | पुरुष | भ.ज.-क | खुला | गृहरक्षक दल |
| 6 | 13192 | प्रविण राजाराम ढोले (बॅण्डस्मन) | पुरुष | भ.ज.-क | खुला | सर्वसाधारण |
| 7 | 13868 | जाविदखान बाळासाहेब मुजावर | पुरुष | इ.मा.व. | इ.मा.व. | माजी सैनिक |
| 8 | 13869 | शंकर शामराव साबळे | पुरुष | अनु.जाती | अनु.जाती | माजी सैनिक |
| 9 | L 423 | दिक्षा शहाजी खांडेकर | महिला | भ.ज.-क | खुला | महिला 30% |
| 10 | L 2239 | सुप्रिया सुभाष जाधव | महिला | सा.शै,दु.मा.व. | खुला | महिला 30% |
| 11 | 13019 | आकाश उमाजी गायकवाड | पुरुष | सा.शै,दु.मा.व. | खुला | खेळाडू |
| 12 | 13894 | राहुल महादेव चौरे | पुरुष | सा.शै,दु.मा.व. | सा.शै,दु.मा.व. | माजी सैनिक |
| 13 | L 1852 | सुदेशना सुदाम शिंदे | महिला | इ.मा.व. | इ.मा.व. | महिला 30% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 9626 | हर्षद त्र्यंबक तळेकर | पुरुष | इ.मा.व. | इ.मा.व. | सर्वसाधारण |
| 15 | L 2132 | एकता सोमनाथ वाळुंज | महिला | इ.मा.व. | खुला | महिला 30% |
| 16 | L 2630 | श्रीविद्या बाबाजी चक्कर | महिला | सा.शै,दु.मा.व. | सा.शै,दु.मा.व. | महिला 30% |
| 17 | 6165 | रंजन शिवाजी गावडे | पुरुष | भ.ज.-क | भ.ज.-क | गृहरक्षक दल |
| 18 | L 2776 | साक्षी बाळु शेंगाळ | महिला | अनु.जमाती | अनु.जमाती | महिला 30% |
| 19 | L 2785 | सुप्रिया सुनिल माळवे | महिला | अनु.जाती | खुला | महिला 30% |
| 20 | L 1626 | साक्षी तानाजी कोहिनकर | महिला | सा.शै,दु.मा.व. | सा.शै,दु.मा.व. | महिला 30% |
| 21 | 1143 | राहुल सुरेश कापडी | पुरुष | भ.ज.-क | खुला | सर्वसाधारण |
| 22 | L 1566 | सिमरन फारुक काझी | महिला | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | महिला 30% |
| 23 | 12264 | शाम नागनाथ लोखंडे | पुरुष | अनु.जाती | अनु.जाती | सर्वसाधारण |
| 24 | L 2033 | आम्रपाली गौतम इंदूरकर | महिला | अनु.जाती | अनु.जाती | महिला 30% |
| 25 | 13575 | शुभम दिनेश सुर्यवंशी (बॅण्डस्मन) | पुरुष | इ.मा.व. | खुला | सर्वसाधारण |
| 26 | 06 | गोकुळ काळु बागुल | पुरुष | अनु.जमाती | अनु.जमाती | सर्वसाधारण |
| 27 | L 398 | रविना चुनीलाल ठाकरे | महिला | अनु.जमाती | अनु.जमाती | महिला 30% |
| 28 | 6140 | लखन शिवाजी सुर्यवंशी | पुरुष | अनु.जमाती | अनु.जमाती | सर्वसाधारण |
| 29 | 4947 | आदिल दस्तगिर पटेल | पुरुष | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | सर्वसाधारण |
| 30 | 12120 | राजु यल्लाप्पा पवार | पुरुष | वि.जा.-अ | वि.जा.-अ | सर्वसाधारण |
| 31 | 11381 | तुकाराम भाऊराव जुंबडे | पुरुष | अनु.जमाती | अनु.जमाती | सर्वसाधारण |
| 32 | 7089 | तहेजीब नुर सय्यद | पुरुष | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | सर्वसाधारण |
| 33 | 9836 | कल्पेश काशिनाथ भोईर | पुरुष | इ.मा.व. | इ.मा.व. | गृहरक्षक दल |
| 34 | L 2366 | मिना भास्कर मेंगाळ | महिला | अनु.जमाती | अनु.जमाती | महिला 30% |
| 35 | 6773 | दिनेश भास्कर मेंगाळ | पुरुष | अनु.जमाती | अनु.जमाती | सर्वसाधारण |
| 36 | 1026 | आलताफ मैनोदीन सय्यद | पुरुष | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | सर्वसाधारण |
| 37 | L 2203 | उन्नती श्रीधर राठोड | महिला | वि.जा.-अ | खुला | महिला 30% |
| 38 | L 1383 | अंजली गणेश रांजीकर | महिला | अनु.जमाती | अनु.जमाती | महिला 30% |
| 39 | L 1913 | अलिशा भागोजी उदेग | महिला | इ.मा.व. | खुला | महिला 30% |
| 40 | L 2302 | रोहिणी अनिरुध्द सोळंके | महिला | सा.शै,दु.मा.व. | सा.शै,दु.मा.व. | महिला 30% |
| 41 | L 698 | शिवानी माधव पिल्लेवाड | महिला | अनु.जमाती | अनु.जमाती | महिला 30% |
| 42 | 12664 | नितीश बसवराज मुळे | पुरुष | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | सर्वसाधारण |
| 43 | L 2228 | प्रतिक्षा फुलचंद गायकवाड | महिला | अनु.जाती | अनु.जाती | महिला 30% |
| 44 | L 2799 | शब्बू अजमेर सय्यद | महिला | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | महिला 30% |
| 45 | L 1338 | प्रियंका मोतीराम कराड | महिला | भ.ज.-ब | खुला | महिला 30% |
| 46 | L 23 | संध्या शिवकांत रेड्डी | महिला | इ.मा.व. | इ.मा.व. | महिला 30% |
| 47 | 12759 | संदिप सोमलिंग नारंगवाडे | पुरुष | इ.मा.व. | इ.मा.व. | खेळाडू |
| 48 | 7017 | रुपेश ज्ञानोबा मस्के | पुरुष | अनु.जाती | अनु.जाती | अनाथ |
| 49 | 4250 | रेहान ताहेर पठाण | पुरुष | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | सर्वसाधारण |
| 50 | L 27 | वैष्णवी राम लामदाडे | महिला | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | महिला 30% |
| 51 | 9891 | रामेश्वर अशोक शिवशेट्टे | पुरुष | आ.दु,दु.घ. | आ.दु,दु.घ. | गृहरक्षक दल |
| 52 | 1639 | ओमकार बळीराम रेकुळवाड | पुरुष | अनु.जमाती | अनु.जमाती | सर्वसाधारण |

**-: अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

1) आपली नियुक्ती ही पुर्णत: हंगामी, तात्पुरत्या स्वरुपाची राहील, शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगावु सूचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यांत येईल.

2) महाराष्ट्र शासन, सा.प्र.विभाग, शा.नि.क्र.बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे आधिन राहून निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

3) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेवून जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात प्रमाणपत्र वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत आलेली असल्याने जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यांत येईल.

4) याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि.25.08.2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आलेली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहुन सदर नियुक्ती आदेश राहील.

5) पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

6) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यांत येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

7) प्रशिक्षण कालावधीत आपणांस कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा कोणतीही नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

8) प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. पोलीस दलात मुलभूत प्रशिक्षणानंतर त्यांची मोटार परिवहन विभाग, आयुधिक विभाग, मरिन विभाग वगैरे विभागामध्ये आवश्यकतेप्रमाणे नेमणूक केली जाईल व त्यांच्यावर बंधनकारक राहील.

9) प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखवल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिका-यांच्या पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहील्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

10) रायगड जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभिर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, ते या घटकाचे कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी कोठेही व केव्हाही बदलीस पात्र होतील.

11) पोलीस शिपाई पदाची नियुक्ती स्विकारल्यानंतर राजीनामा दिल्यास पुर्न:नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

12) ज्या संवर्गातून/जातीच्या प्रवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग/प्रवर्ग सेवाकालावधीत बदलता येणार नाही.

13) पोलीस शिपाई पदावर रुजु झाल्या तारखेपासून 3 महिन्याचे आत उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामन्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.सीडीआर-1079/2059/228/11, दि.20.11.1980 नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र दरवर्षी स्वत:हून भरुन संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

14) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शा.नि.क्र.अनियो/1005/126/सेवा-4, दि.31.10.2005 नुसार त्या दिवशी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्त होणा-या उमेदवाराला **"नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना"** लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम 1982 व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

15) शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/बारा, दि.28.03.2005 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील नियम 4 नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि.28.03.2005 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे सेवेत रहाण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

16) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र.पीएसबी-311/प्र.क्र.521/पोल-5, दि.26.09.2011 व मा.अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि/खर्च/वसुली/2012/2231, दि.26.04.2012 अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर 3 वर्षात पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास किंवा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवारावर झालेला प्रशिक्षण कालावधीतील प्रशिक्षण खर्च प्रतिमहा रु.2000/- प्रमाणे वसुल करुन सरकार जमा करण्यांत येईल, तसे हमीपत्र उमेदवाराने देणे बंधनकारक राहील.

17) पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली 1951 भाग-1 मधील नियम क्र.78(1)(V) ते (VIII) अन्वये आपली सेवा केव्हांही समाप्त करण्यांत येईल.

18) पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पुर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणास गैरहजर राहील्यास महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 भाग-1 मधील नियम क्र.78(1)(VIII) खालील टिप नुसार कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्यांत येईल.

19) महाराष्ट्र पोलीस सेवाप्रवेश नियम 2011 मधील नियम 12 अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व सदर प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणारी परिक्षा 4 संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर 4 संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण केली नाही, तर त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल. या कालावधीमध्ये वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

20) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम 2016 नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 या मुख्य नियमामधील नियम 3(1)(क) नंतर उपखंड (ड) समाविष्ठ करण्यांत आलेला असून त्यानुसार अन्य अर्हता म्हणून पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 2(21) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण करणे बंधनकारक राहील. परंतु सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर 02 वर्षाचे आत धारण करण्यांत यावा. जर या कालावधीत हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास नियुक्ती रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

21) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम 2016 नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 या मुख्य नियमामधील नियम 12 नंतर नियम 13 अंतर्भूत करण्यांत आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहीत करण्यांत येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

22) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.5/2001/39, दि.20.07.2002 मधील तरतुदीनुसार नियुक्तीच्या दिनांकापासून 01 वर्षाचे आत संगणक हाताळणी/वापराबाबत शासन मान्य विहीत प्रमाणपत्र सादर करावे. सदर विहीत मुदतीत प्रमाणपत्र सादर न करणारा उमेदवार विहीत प्रमाणपत्र सादर करेपर्यंत त्याची वेतनवाढ रोखण्यास पात्र राहील.

23) आपणांस महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर हिंदी व मराठी भाषा परिक्षा त्या संबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

24) या आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम 1951, महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम 1956, महाराष्ट्र नागरी सेवा व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील. सदर नियमातील तरतुदीनुसार उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

25) उमेदवार कर्तव्यावर रुजु होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल.

26) नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणांस पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा दयावयाची असल्यास त्या परिक्षेस बसणेसाठी अर्ज करणेपुर्वी त्यांनी या कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

27) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/6/10/पो.शि.भरती/सेवाजेष्ठता/251/2012, दि.17.08.2013 अन्वये स्थायी आदेश क्र.22/2013 मधील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता निश्चित करण्यांत येईल.

28) सुधारीत पोलीस शिपाई भरती नियम-2011 व महाराष्ट्र शासन, गृहविभाग, शा.नि.क्र.संकिर्ण-1017/3843/प्र.क्र.469/ पोल-5ब, दि.26.10.2017 मधील तरतुदीनुसार घटक बदली नियमावली लागु राहील.

29) आपण समांतर आरक्षण लाभ घेण्यासाठी सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र व इतर कोणतीही कागदपत्रे/प्रमाणपत्रे भविष्यात खोटे असल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा कोणतेही कारण न देता तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

30) मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती 2022-2023/173/2023/966, दि.16/07/2024 अन्वये ज्या मराठा समाजातील उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) ऐवजी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातुन अर्ज सादर केलेले आहेत. त्यांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) ऐवजी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC), व खुला प्रवर्ग (OPEN) यापैकी एका प्रवर्गाचा फायदा अनुज्ञेय ठरतो, असे निर्देश प्राप्त झालेले आहेत तसेच मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती 2022-2023/173/2023/1200,
दि.23/08/2024 अन्वयें आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून त्यांचे नांव वगळण्यात यावे व जर ते आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाऐवजी खुल्या प्रवर्गात पात्र ठरत असल्यास त्यामध्ये त्यांचा लेखी विकल्प घेवून समावेश करावा, असे निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदर निर्देशाच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहेत.

31) महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-2018/व्ही.आय.पी.67/प्र.क्र.207/कार्या.12, दि.28.05.2018 व महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) निमयावली, 1982 मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत संबंधीत उमेदवारांनी नियुक्ती ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवाराकडून देण्यांत येणा-या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

**( सोमनाथ घार्गे )**
**पोलीस अधीक्षक रायगड-अलिबाग**

**प्रति,**

**वरिल सर्व संबंधीत उमेदवार यांना**

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

**1) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, रायगड-अलिबाग**

02/- सदर आदेश पोलीस मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर त्वरीत डंकविण्यांत यावे. तसेच उपरोक्त नमूद 120 उमेदवार यांना पोलीस शिपाई पदावर पोलीस मुख्यालय येथे हजर करुन त्यांची नोंद हजेरी पटावर घेवून उमेदवार हजर झाल्याची तारीख या कार्यालयास सादर करावी. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना आवश्यक तो सर्व किट सरंजाम किट पेटीसह अदा करुन त्यांना पोलीस प्रशिक्षण विद्यालयात पुढील प्रशिक्षणासाठी रवाना करेपर्यंत त्यांना पोलीस मुख्यालयात प्रारंभी प्रशिक्षण देण्यांत यावे. हजर झालेल्या उमेदवारांचा अहवाल त्वरीत दिनांक व वेळेसह त्वरीत सादर करावा.

**2) प्रमुख लिपीक, लेखा शाखा**

03/- शासन निर्णय क्र.अनियो/1005/126/सेवा-4, दि.31.10.2005 अन्वये दि.01.11.2005 नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेवून प्रचलित नियमांप्रमाणे वेतन व भत्यांची आकारणी करावी. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना मुलभूत प्रशिक्षणासाठी पाठविण्यांत येणार असल्याने सदरची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी.

**3) प्रभारी अधिकारी, सायबर पोलीस ठाणे, रायगड-अलिबाग**

04/- वरिल प्रमाणे नियुक्तीचे आदेशाची समज सर्व संबंधीत उमेदवारांना एसएमएसद्वारे देवून त्यांना **त्वरीत पोलीस मुख्यालय-अलिबाग** येथे हजर राहण्याची समज दयावी.

4) **प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, रायगड-अलिबाग**

05/- वरिल प्रमाणे नियुक्तीचे आदेशाची समज सर्व संबंधीत उमेदवारांना फोनद्वारे देवून त्यांना **त्वरीत पोलीस मुख्यालय-अलिबाग** येथे हजर राहण्याची समज दयावी.

**प्रत :- पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), रायगड-अलिबाग / डी.पी.जी.**

# सुचनापत्र

## पोलीस शिपाई पदी नियुक्ती देण्यांत आलेल्या उमेदवारांसाठी सुचना

1. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेसकरीता रु.5000/- ॲडव्हान्स भरणे आवश्यक असल्याने सदरची रक्कम येताना बरोबर आणावी.

2. हजर होणा-या उमेदवारांनी त्यांचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहीत्य उदा.गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, इतर साहित्य, बाडविस्तारा, जेवणासाठी ताट, वाटी, तांब्या तसेच बादलीं, मग वगैरे साहित्य बरोबर आणावे.

* * * * *